UGC Approved Journal
Research Link

Since March 2002

An International, Registered & Refereed Monthly Journal : **Library Science**
Research Link - 168, Vol - XVII (1), March - 2018, Page No. 63-64
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# नागपूर शहरातली पुरुष डॉक्टरांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास

*वैद्यकीयशास्त्र हे मानवी जातीला मिळालेले अनमोल वरदान आहे. पुरुष डॉक्टर आपल्या वाढत्या व्यापामुळे तेवढा वेळ वाचनाला देऊ शकत नाही आणि अद्यावत विषयज्ञान प्राप्त करण्यासाठी जे बाब प्रत्येकच क्षेत्राची आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वाढत्या वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेमुळे व्यावसायिकांची रुग्णाकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यांच्या सेवा कार्यपद्धती यांच्यात यांत्रिकपणा येत आहे. वस्तुनिष्ठतेचा लाभ घेत असतांना हे व्यवसायिक आपल्या रुग्णाकडे एक संपुर्ण व्यक्ती किंवा समाज घटक म्हणून पाहण्या ऐवजी रोगग्रस्त शरीरधारण केलेला सजीव म्हणुन पाहतात. काटेकोर वैद्यानिक तंत्राच्या पलीकडे जाणारे वैद्यक हे एक मानवी तत्वज्ञान आहे. यातून आरोग्याचा कधीही न संपणारा शोध चालु राहील. आरोग्याची संकल्पना बदलत राहील.*

**रेवाराम एम.मालखेडे**

**प्रस्तावना :**

ग्रंथालय म्हणजे वाचनासाठी किंवा अभ्यासाठी असलेल्या वाचन साहित्याचा संग्रह असतो. ज्ञान हे मानवी जीवनातील संपत्ती आहे. आणि ग्रंथालय हे ज्ञानाचा संग्रह करीत राहणारे भांडार आहे. मानवी समाजाच्या विकासात ग्रंथालयाचा सिंहाचा वाटा आहे. जसजसे छपाईचे स्वरूप बदलू लागले. तसतसा ग्रंथलयाच्या संकल्पने मध्ये बदल होऊ लागला आज ग्रंथालयाचे स्वरूप बदलून माहिती तंत्रज्ञानाने घेतले आहे. ग्रंथालये ही केवळ माहितीची संग्रहालयं नसून सामाजिक शक्ती स्थाने असतात व त्यांच्यामुळेच नव्या माहितीची किंवा विचारांची निर्मिती ही होऊ शकते.

वाचनाची आवड नसणे म्हणजे या जासतील एका अलौकीक आनंदास मुकणे होय. बुध्दीमान विद्यार्थी चांगला शिक्षक, उत्कृष्ट प्राध्यापक, उत्कृष्ट वक्ता, अष्टपैलू राजकारणी, चागला किर्तनकार होण्यासाठी ही जशी वाचनाची प्रचंड अभिरूची असणे आवश्यक असते, तसेच यशस्वी उद्योजक, इंजिनिअर किंवा वकील होण्यासाठी विविध क्षेत्रातील किंवा स्वतःच्या क्षेत्रातील विषयाबाबत वाचन अभिरूची असणे आवश्यक आहे. कारण वाचनाद्वारे अज्ञान दुर करून ज्ञानी माणसांची गरज साध्य करता येते.

**विषय निवडी मागील उद्देश :**

जे पुरूष डॉक्टर या व्यवसायात आहेत त्यांच्या शिक्षणाप्रमाणे त्यांच्या आवडी प्रमाणे प्रत्येक पुरूष डॉक्टरांची रूची वेगवेगळी असू भाकते. ते सार्वजनिक ग्रंथालयाचा त्याच प्रमाणे वैद्यकिय ग्रंथालयाचा किती प्रमाणात लाभ घेतात. त्याचप्रमाणे आपल्या वाचन अभिरूचीचा त्यांच्या व्यवसायात किती प्रमाणात उपयोग होतो याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर प्ररूपात केला आहे.

(1) वैद्यकिय शास्त्रातील डॉक्टर आधुनिक वाचन साहित्याचा शोध कशा प्रकारे घेतात. (2) वैद्यकिय कार्य पार पाडतांना पुरूष डॉक्टर कशा प्रकारे आपली वाचनांची आवड पुर्ण करण्याचा प्रयत्न करतात यविषयी अभ्यास करणे. (3) ग्रंथालयातील व्यावसायीक वाचन साहित्याचा पुरूष डॉक्टर कसा लाभ घेतात याचा अभ्यास करणे. (4) उपलब्ध वाचन साहित्यातुन पुरुष डॉक्टरांच्या आधुनिक वैद्यकशास्त्रा विषयी माहिती उपलब्ध होऊन त्याबाबतीत त्यांच्या संपूर्ण गरजांची पूर्तता होते काय? याचा अभ्यास करणे.

**व्याप्ती :**

नागपूर भाहरातील पुरुष डॉक्टरांच्या वाचन सवयीच्या अभिरुचीचा अभ्यास या विषयात करणार आहे.

**मर्यादा :**

(1) प्रस्ताविक लेखात केवळ नागपूर शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील पुरुष डॉक्टरांच्या वाचन अभिरुचीचा अभ्यास करण्यात येईल.

(2) केवळ वैद्यकीय व्यवसायातीलच पुरूष डॉक्टरांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यास प्रायोजित आहे.

नागपूर शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील पुरूष डॉक्टरांच्या वाचन अभिरूचीचे अध्ययन करतांना अभ्यासकर्त्याने ज्या प्रश्नावल्या भरून प्राप्त केल्या त्या प्रश्नावलीच्या माध्यमातून सांख्याकिय माहिती काढण्यात आली आहे.

सदर प्रश्नावलीच्या साहाय्याने प्राप्त माहितीचे विश्लेषण करून पुरूष डॉक्टरांच्या वाचन अभिरूचीचा अभ्यासकरण्याचा छोटासा प्रयत्न केला.

**तक्ता क्र. 1 : नागपूर शहरातील पुरूष डॉक्टर**

| अ. क्र. | पुरूष डॉक्टरांना वाटलेल्या प्रश्नपत्रिका | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 120 | 90 | 75.00% |
| 2 | 120 | 90 | 75.00% |

**तक्ता क्र 2 : ग्रंथालयात जाण्याचा उद्देश**

| अ. क्र. | उद्देश | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अभ्यासाकरीता/ संशोधन /शिकवणे | 27 | 30.00% |
| 2 | महिती मिळविण्याकरीता | 42 | 46.67% |
| 3 | अन्य वाचन साहित्याचा उपयोग घेण्याकरीता | 18 | 20.00% |
| 4 | अन्य कामासाठी | 3 | 03.33% |
| | **एकूण** | **90** | **100.00%** |

*ग्रंथपाल, राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, सावरगांव, त.नरखेड, जि.नागपूर ( महाराष्ट्र )*

वरील विश्लेषणावरून असे लक्षात येते की, अद्यावत नवनवीन माहिती मिळविणसाठी वैद्यकीय ग्रंथलयांचा पुरूष डॉक्टर जास्त प्रमाणात लाभ घेतात आणि काही पुरूष डॉक्टर शिकविण्याच्या उद्देशाने आणि काही पुरूष डॉक्टर अन्य माहिती जमा करण्यासाठी भेटी देतात.

**तक्ता क्र 3 : ग्रंथालयात भेटी देण्याची वारंवारीता**

| अ. क्र. | वेळा | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | आठवडयातुन एकदा | 43 | 47.78% |
| 2 | आठवडयातुन दोन वेळा | 33 | 36.67% |
| 3 | आठवडयातुन चारदा | 14 | 15.55% |
| 4 | रोज | 00 | 00.00% |
| | **एकुण** | **90** | **100.00%** |

**तक्ता क्र 4 : अद्यावत माहीती मिळविण्यासाठी**

| अ. क्र. | वेळा | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | रोगविषय अद्यावत माहिती मिळविण्यासाठी | 38 | 42.22% |
| 2 | चिकित्सा विषयक माहिती मिळविण्यासाठी | 19 | 21.11% |
| 3 | शस्त्रक्रियेवरील माहिती मिळविण्यासाठी | 07 | 7.78% |
| 4 | रसायनावरील माहिती मिळविण्यासाठी | 06 | 6.67% |
| 5 | औषधावरील अद्यावत माहिती मिळविण्यासाठी | 20 | 22.22% |
| | **एकुण** | **90** | **100.00%** |

वरील तकत्यावरून असे निदर्शनास येते की, नविन रोगावर अद्यावत माहीती मिळून त्यावर इलाज करण्यासाठी पुरूष डॉक्टर जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करतात.

**तक्ता 5 : कुठल्या वाचन साहित्याचा वापर जास्त होतो**

| अ. क्र. | वाचन साहित्यास मिळालेला प्रतिसाद | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | विषयाशी संबंधीत पुस्तके | 27 | 30.00% |
| 2 | नियतकालीके | 12 | 13.33% |
| 3 | संदर्भ ग्रंथ | 10 | 11.11% |
| 4 | इंटरनेटचा वापर | 15 | 16.67% |
| 5 | वर्तमानपत्रे | 24 | 26.67% |
| 6 | विश्वकोश | 02 | 02.22% |
| | **एकुण** | **90** | **100.00%** |

जास्तीत जास्त पुरूष डॉक्टर संबंधीत विषयाची पुस्तके वाचतात नंतर वर्तमानपत्रे, इंटरनेट नंतर क्रमश नियतकालीके, संदर्भ ग्रंथ व विश्वकोश यांचा वापर करतात.

**तक्ता क्र. 6 : आपल्याला हवी असलेली माहीती मिळविण्यात पुरूष डॉक्टर कितपत यशस्वी होतात**

| अ.क्र. | माहीती मिळविण्यास यशस्वी पुरूष डॉक्टर | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नेहमी | 69 | 76.67% |
| 2 | कधी कधी | 21 | 23.33% |
| | **एकुण** | **90** | **100.00%** |

76.67% पुरूष डॉक्टर आपल्याला हवी असलेली माहीती मिळविण्यात यशस्वी होतात.

पुस्तक विकत घेण्यावर 58.89% पुरूष डॉक्टर पैसा खर्च करतात. तर 41.11% करीत नाही.

**तक्ता क्र. 7 : पुस्तके विकत घेण्यासाठी पुरूष डॉक्टर पैसा खर्च करतात काय?**

| अ. क्र. | वेळा | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 53 | 58.89% |
| 2 | नाही | 37 | 41.11% |
| | **एकूण** | **90** | **100.00%** |

**तक्ता क्र. 8 : ग्रंथालयाचा वापर**

| अ. क्र. | ग्रंथालये | मिळालेला प्रतिसाद | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक ग्रंथालय | 09 | 10.00% |
| 2 | वैद्याकीय ग्रंथालय | 76 | 84.44% |
| 3 | विद्यापीठीय ग्रंथालय | 05 | 05.56% |
| | **एकुण** | **90** | **100.00%** |

पुरूष डॉक्टर वैद्यकीय ग्रंथालयाचा जास्तीत जास्त लाभ घेतात हे वरील तक्त्यावरून निदर्शनास येते.

**निष्कर्ष :**

वरील प्राप्त झालेल्या प्रष्नावलीच्या माध्यमातून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. थोडक्यात असे निदर्शनास येते की, आज समाजात जी वेगवेगळी क्षेत्र मानवाने निर्माण केलेली आहेत त्यात वैद्यकीय क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण आहे. वैद्यकीयशास्त्र हे मानवी जातीला मिळालेले अनमोल वरदान आहे. पुरूष डॉक्टर आपल्या वाढत्या व्यापामुळे तेवढा वेळ वाचनाला देऊ शकत नाही आणि अद्यावत विषयज्ञान प्राप्त करण्यासाठी जे बाब प्रत्येकच क्षेत्राची आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वाढत्या वैज्ञानिक वस्तुनिष्ठतेमुळे व्यावसायिकांची रूग्णाकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यांच्या सेवा कार्यपद्धती यांच्यात यांत्रिकपणा येत आहे. वस्तुनिष्ठतेचा लाभ घेत असतांना हे व्यवसायिक आपल्या रूग्णाकडे एक संपुर्ण व्यक्ती किंवा समाज घटक म्हणून पाहण्या ऐवजी रोगग्रस्त शरीरधारण केलेला सजीव म्हणुन पाहतात. काटेकोर वैद्यानिक तंत्राच्या पलीकडे जाणारे वैद्यक हे एक मानवी तत्वज्ञान आहे. यातून आरोग्याचा कधीही न संपणारा शोध चालु राहील. आरोग्याची संकल्पना बदलत राहील.

<u>**संदर्भ :**</u>


*(1) पवार, एस. पी. (2005) : ग्रंथालय व माहीतीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापुर.*

***(2)** लेले, वसंत बि. (2012) : ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विविध पैलु, युनिव्हर्सल प्रकाशन, पूणे.*

***(3)** अंधाव उद्धव : सार्वजनिक वाचनालयाचे साहित्य प्रसारणातील योगदान; वाटा वाचनालयाच्या (फेब्रुवारी 2007), 6–7.*

***(4)** कुलकर्णी, सिमा, 'दिशा' (1998) : सामाजिक आरोग्य संशोधक संस्था पूणे.*


❁❁